सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
# Maharashtra Water Resources Regulatory Authority


१११/४१

क्र. मजनिप्रा/२०१८/PRCL/VIDC/१०२/३६०　　　　दिनांक : ०६/०६/२०१८

प्रति,
कार्यकारी संचालक
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन्स,
नागपूर-४४० ००१.

विषय : चनखा उपसा सिंचन योजना, ता. केळापूर, जि. यवतमाळ - यांस मजनिप्राची मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ : का.सं. विपाविम नागपूर यांचे पत्र क्र. २९१०/कातां-३(१)/(धा.क्र.४९/२०१७) दि. २६/०३/२०१८

१.० संदर्भीय पत्रान्वये चनखा उपसा सिंचन योजना, ता. केळापूर, जि. यवतमाळ यांस मजनिप्राची मंजुरीस्तव प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

२.० राज्य शासनाने जलसंपदा प्रकल्पांना प्रमा व सुप्रमा प्रदान करण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना दि. २१/०९/२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केल्या आहेत. सदर निर्णयातील परि. १ नुसार ज्या प्रकल्पांची किंमत २५ कोटी पेक्षा जास्त आहे अशा प्रकल्पांचे प्रमा प्रस्ताव प्रथम महामंडळांनी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती (SLTAC) कडे छाननी व मान्यतेसाठी सादर करावे. त्यानंतर त्यांच्या मान्यतेसह सदर प्रस्ताव महामंडळांनी प्राधिकरणाकडे कलम ११(च) च्या मान्यतेसाठी सादर करावेत. का.सं.

C:\Users\ROHAN-\Project Clearance\VIDC\१०२.docx


9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005.
Tel.:(O)+91-22-2215 2019, Email:mwrra@mwrra.in I mwrralibrary@yahoo.co.in I Website : www.mwrra.org

विपाविम नागपूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावासोबत राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालाची प्रत जोडलेली नाही, ती सादर करावी.

३.० तसेच मा. राज्यपाल यांच्या २०१८-१९ साठीच्या निदेशातील परिच्छेद १८ मधील तरतुदीनुसार सदर प्रकल्पास राज्य शासनाने चालू प्रकल्पांवरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम होऊ न देता, निश्चित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण होण्याचा दृष्टीने पुरेसा अतिरिक्त निधी कसा उपलब्ध करून दिला जाणार आहे याबाबतचे नियोजन शासनाचे मान्यतेने सादर करावे.

४.० उपरोक्त परि. २ व ३ चे पूर्तते अभावी संदर्भिय प्रस्ताव प्राधिकरणाचे बैठकीत निर्णयासाठी ठेवता येत नाही. उपरोक्त परि. २ व ३ चे पुर्ततेसाठी प्रस्ताव परत करण्यात येत आहे. पुर्ततेसह फेरप्रस्ताव त्वरित पाठवावा.

O/c

(डॉ. सुरेश कुलकर्णी)
सचिव

गोपनीय लिपिक
जलसंपदा विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

प्रत

१) प्रधान सचिव (जसंप्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड मुंबई - ४०००३२.

२) मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, सिंचन भवन, शिवाजीनगर कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२.

३) अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे मंडळ, वाघापूर रोड, यवतमाळ - ४४५ ००१.